# संपादकीय



महानिर्मितीच्या महत्त्वाकांक्षी विस्तारीकरण कार्यक्रमाअंतर्गत विविध प्रकल्प उभारणीचे सचित्र दर्शन सृजनच्या या प्रकल्प विशेषांकाद्वारे आपणा सर्वांना होणार आहे. यातील परळी-पारस येथील प्रत्येकी २५० मेगावॅटचे तसेच भुसावळ (२ X ५०० मेगावॅट) व खापरखेडा (५०० मेगावॅट) हे प्रकल्प तर झपाटयाने पूर्णत्वास जात आहेत, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. या प्रगतीचा प्रत्यक्ष आढावा मा. ऊर्जामंत्री यांनी आपल्या सर्व प्रकल्पस्थळी दिलेल्या भेटीतून नुकताच घेतला आहे.

स्थापित क्षमतेएवढी वीजनिर्मिती व प्रकल्पांची वेळेत उभारणी या दोन किमान व रास्त अपेक्षा मा. व्यवस्थापकीय संचालक यांचे मनोगतातून या अंकात व्यक्त झालेल्या आहेत. आपण या आवाहनास मनापासून सक्रीय प्रतिसाद द्याल, ही खात्री आहे. जास्तीत-जास्त वीजनिर्मिती ही आता केवळ महानिर्मितीचीच नव्हे तर एक राष्ट्रीय गरज बनलेली आहे.

कर्मचाऱ्यांच्या एकूण वार्षिक कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी एका नव्या संकल्पनेची ओळख करुन देणारा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांचा लेख या अंकात समाविष्ट आहे.

या अंकात सौ. भारती पवार, रमेश थोरात, रामचंद्र शिंदे यांचे लेख या अंकात आहेत. कोयना जलविद्युत केंद्रातील अभियंते मकरंद जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी नागालॅण्डमधील अनोख्या संकल्पनेपासून प्रेरणा घेऊन राबवलेला लघुत्तम जल वीजनिर्मितीचा निश्चितच स्तुत्य उपक्रम अंकात समाविष्ट आहे.

गेल्या त्रैमासिक अंकापासून आपण नवीन 'आरोग्यविषयक सदर" सृजनमधून सुरु केलेले आहे. त्याविषयी आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवाव्यात.

नाशिक प्रशिक्षण केंद्रातील 'मॉडेल म्युझियम" विषयक लेख या अंकात समाविष्ट आहे. असे 'मॉडेल म्युझियम" प्रत्येक वीजनिर्मिती केंद्रात उभारल्यास स्थानिक कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण प्रशिक्षणासाठीही त्याचा निश्चितच उपयोग होऊ शकेल. गेल्या वर्षभरात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करण्या-या भुसावळ औष्णिक वीज केंद्राची यशोगाथा या अंकात समाविष्ट आहे.

दहावी व बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन करुन विशेष नैपुण्य प्राप्त केलेल्या महानिर्मिती कर्मचाऱ्यांच्या अनेक गुणवंत पाल्यांचा गौरव या अंकात समाविष्ट आहे. या सर्वांचा महानिर्मितीला निश्चितच अभिमान आहे.

इंग्रजी विभागात महाव्यवस्थापक श्री. जी.डी. पाटील, व श्री. धोतरकर यांचे लेखही उल्लेखनीय आहेत. या अंकातील कविता विभागात नेहमीप्रमाणे आपल्या कर्मचारी कलावंतांनी मुक्त सहभाग नोंदवला आहे.

नूतन संचालक (प्रकल्प) श्री. चंद्रकांत थोटवे, कार्यकारी संचालक (सं. व सु. - २) श्री. विजय सिंह व कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन) श्री. माणिक वाघमोडे या सर्वांचे सृजन परिवारातर्फे अभिनंदन.

**महेश आफळे**
जनसंपर्क अधिकारी